PARLE **MAHOTSAV**
Organiser - **ADV. PARAG ALAVANI,** President, Vile Parle Cultural Centre
2, Amber Palace, Chittaranjan Road, Vile Parle (East), Mumbai 400 057.
Tel.: 26136513, 26177125 • Website : www.parlemahostav.com

PARLE MAHOTSAV

**कृपया प्रसिध्दीसाठी**

# चारित्र्यवान समाज घडण्यासाठी पालकांनी आपल्या मुलांना खेळण्यासाठी प्रोत्साहीत करावे- पोलिस उपायुक्त श्री.नामदेव चव्हाण

मुंबई दि.२६ : आपल्या संघाच्या विजयासाठी खेळणारे खेळाडू स्पर्धेच्या निमित्ताने संघटीत राहण्यास शिकतात तसेच वाईट प्रवृत्तींपासून दूर राहतात. त्यामुळे चारित्र्यवान समाज घडण्यासाठी पालकांनी आपल्या मुलांना खेळण्यासाठी प्रोत्साहीत करावे, असे आवाहन पोलिस उपायुक्त श्री.नामदेव चव्हाण यांनी केले. १३ व्या पार्ले महोत्सवामधील विविध स्पर्धांच्या बक्षिस समारंभात ते बोलत होते. समाजातील दुशप्रवृत्तींपासुन आपल्या मुलांना दूर ठेवण्यासाठी जसे पालक दक्ष असतात तसेच मुंबई सुरक्षीत ठेवण्यासाठी आपले 'कान व डोळे' उघडे ठेवून कुठल्याही अनुचीत प्रकार आढळल्यास त्याची माहिती पोलिसांपर्यत पोहचवावी असे आवाहनही त्यांनी केले.

१३ व्या पार्लेमहोत्सवामधील विविध स्पर्धांमध्ये विशेष मुलांनी सर्वांचेच लक्ष वेधून अनेक बक्षिसे मिळवली. आपल्यामधील नैसर्गिक कमतरतांवर जिद्दीने मात करत स्वतःच्या गुणवत्तेवर बक्षिसे मिळवणारे हे स्पर्धक म्हणजे सर्वांसाठी आदर्श आहेत,असे प्रमुख आयोजक ॲड. पराग अळवणी यांनी या विशेष मुलांचे कौतुक केले. गायन स्पर्धेमध्ये सर्व स्पर्धकांमध्ये भाग घेऊनही प्रथम पारितोषिक मिळवणारा ओमकार महाडीक, द्वितीय पारितोषिक मिळवणारी तुलसी झवेरी व संकृती ब्रिद तर एक हात अधू असल्यामुळे केवळ एका हाताने रांगोळी काढून प्रथम पारितोषीक मिळवणारा श्रेयस कांजी तसेच चित्रकला मधील विशेष मुलांसाठीच्या स्पर्धेत अहमदनगरवरून आलेला अक्षय वैद्यने प्रथम पारितोषीक  मिळवले. या सर्व स्पर्धकांना पारितोषिके देताना प्रमुख पाहुण्यांसह उपस्थित सर्वच भारावून गेले होते. पार्ले महोत्सवात जमलेल्या खेळाडू रसिकांच्या अलोट गर्दी समोर एका  बास्केट बॉल प्रशिक्षकाच्या जीवनावरील आधारीत 'अजिंक्य' या  जानेवारीत प्रदर्शित होणाऱ्या चित्रपटाबाबत अभिनेते संदिप कुलकर्णी व अभिनेत्री कादंबरी कदम यांनी  संवाद साधला. केवळ जिंकण्यासाठी नव्हे तर आनंद घेण्यासाठी खेळायच असत हाच संदेश पार्ले महोत्सवा मधून मिळतो  व 'अजिंक्य'मध्येही असाच विषय मांडला असल्याचे त्यांनी  सांगितले

पार्ले महोत्सवाच्या चवथ्या दिवशी बॅडमिटंन, स्वरचीत काव्य वाचन, केशरचना, नखंरचना, मेहंदी या स्पर्धांमधून सुमारे १००० स्पर्धकांसह आधीच सुरू झालेल्या टेबलटेनीस, खो-खो, कबड्डी, वॉलीबॉल, क्रिकेट या स्पर्धांमधून ४ हजार स्पर्धकांनी भाग घेतला. तर चवथ्या दिवशी देण्यात आलेल्या ५० बक्षिसांसह आतापर्यंत  एकूण ४५० बक्षिसे बहाल करण्यात आली. महोत्सवामध्ये उपायुक्त नामदेव चव्हाण, सहाय्यक आयुक्त श्री.धनराज वंझारी, अभिनेते संदिप कुलकर्णी व कादंबरी कदम, साठ्ये महाविद्यालयाच्या प्रचार्या डॉ.कविता रेगे, नगरसेविका सौ.ज्योती अळवणी, सामाजिक कार्यकर्ते श्री.रायसीभाई शाह, श्री.पवनकुमार सांवरमल, श्री.बकूलभाई ठक्कर, श्री.विनयभाई नंदू, उपविभागप्रमुख श्री.मंगेश नाईक इत्यादी प्रमुख पाहुणे या नात्याने उपस्थित होते अशी माहिती ॲड. पराग अळवणी यांनी दिली.

———————————————————————————

सदर पत्रक श्री.चरणजीत सिंग संधू, सहआयोजक पार्ले महोत्सव यांनी प्रसिध्द केले आहे.